// गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(महाविद्यालय विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२१६५९४, २२३१०४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्र/गो.वि./महा.वि/ ८०३ /२०१५
दिनांक: ०९/०६/२०१५

प्रती,

मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
संलग्नित सर्व महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

विषयः— जम्मू काश्मीर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायामुळे विस्थापीत झालेले नागरिक आणि या कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी/निमलष्करी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना विशेष शैक्षणिक सवलत

संदर्भः— १. उशिनाग/बि.एड/३६११/१५ दि. २३/६/२०१५
२. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,म.रा.पुणे यांचे पत्र क्र उशिसं/२०१५/जम्मु काविम/ मवि १/५९०९ दि. १६ जुन २०१५
३. उशिसं/२०१५/जम्मु काविप/मवि १/५९०९ दि. १६ जुन २०१५

मा.महोदय/महोदया,

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येत असलेल्या सर्व महाविद्यालयांना उपरोक्त विषयाकिंत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की,जम्मू काश्मीर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायामुळे विस्थापीत झालेले नागरिक आणि या कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी/निमलष्करी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना विशेष शैक्षणिक सवलतीबाबतची कार्यवाही संदर्भ पत्र क्र २ नुसार करण्यात यावी हि विनंती.

सहपत्रः सदंर्भ पत्र क्र २ संलग्नीत

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)
महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी

१. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, जूने मॉरिस कॉलेज,सिव्हील लाईन नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर

जावक क्र. २३६६
कार्यालय ... शिक्षण सहसंचालक,
नागपूर ..., नागपूर - ४४० ००१
दिनांक २३/६/१५

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : dhepune@yahoo.co.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१२११५३

क्र.उशिसं/२०१५/जम्मू काविप/मवि-१ / 5909 दिनांक- 16 JUN 2015

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण.

विषय :- जम्मू आणि काश्मिर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायांमुळे विस्थापित झालेले नागरिक आणि या कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी / निमलष्करी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना विशेष शैक्षणिक सवलत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. टीइएम ८०९६/७४८८/टी.ई.१ ,दि.२४ जून १९९६
२. शासन निर्णय क्र. जेकेसी -२००९/(३७/०९)/मशि-२,दि.२८ जून २००९

उपरोक्त विषयांकित प्रकरणी जम्मू काश्मिर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायांमुळे विस्थापित झालेले नागरिक आणि कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले लष्करी / निमलष्करी अधिकारी व कर्मचारी तसेच सदर कामासाठी नियुक्त इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना महाराष्ट्र राज्यातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश मिळण्याकरिता विशेष सवलत देण्याबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे.

सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक अनुदानित व विनाअनुदानित पदवी / पदविका महाविद्यालयात मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा १ जागा अतिरिक्त निर्माण करून प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.त्यानुसार विहित नमुन्यात अर्ज संचालक (उच्च शिक्षण) यांचेकडे करावयाचा असतो.

सदर जम्मू काश्मिर कोट्यातून विद्यार्थी निवड करण्यासाठी गुणवत्ता (Merit) व प्राधान्यक्रमानुसार (Preference) प्रवेश द्यावयाचा असल्याने अर्ज करण्यासाठी अंतिम दिनांक ठरवणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्व संबंधितांनी संचालनालयाकडे अर्ज करण्यासाठी दि.३० जून २०१५ हा दिनांक निश्चित करण्यात येत आहे.सदर सूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अशा उपरोक्त कोट्यातून प्रवेश मिळवण्यासाठी संपर्क करणाऱ्या विद्यार्थी व पालकांना सदर दिनांकापूर्वी संचालनालयाकडे अर्ज करण्याबाबत कळविण्यात यावे. दि.३० जून २०१५ पर्यंत आलेले सर्व अर्ज विचारात घेवून त्याबाबत कार्यवाही करण्यास आपणास कळविणेत येईल तोपर्यंत सदर कोट्यातून विद्यार्थ्यांना परस्पर आपल्या स्तरावरून प्रवेश देण्यात येवू नये.

(डॉ. धनराज माने)
संचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

20-06-2015